

नवीन वर्षाचे झाड

व्लादिमीर सुतीव

मराठी: अश्विनी बर्वे

MINI PROGRESS & MINI RADUGA



त्यादिवशी सकाळी मुलांनी
कॅलेंडर बघितले,
तो वर्षाचा शेवटचा दिवस होता
३१ डिसेंबर

उद्या नवीन वर्ष! उद्याचा दिवस मस्त सुट्टी असेल. त्या सुट्टीत नवीन झाडं लावतात. खेळणी आपण स्वतः तयार करू या. पण नवीन वर्षाचे झाड आपल्याजवळ नाही.

मुलांनी फ्रॉस्ट आजोबाना पत्रं लिहण्याचे ठरवले म्हणजे ते दाट जंगलातून त्यांच्यासाठी नवीन वर्षासाठी एक झाड पाठवतील. सगळ्यात भारी आणि सुंदर नवीन वर्षाचे झाड.



मुलांकडून फ्रॉस्ट आजोबांना :

प्रिय फ्रॉस्ट आजोबा !

कृपया नवीन वर्षासाठी आम्हांला
नवीन वर्षाचे झाड पाठवा.

हो, झाड सजवण्यासाठी आम्ही
स्वतः खेळणी तयार करू.

आमचा स्नोमॅन तुमच्यासाठी
एक पत्र घेऊन येईल!

- मुले



मुलांनी ते पत्र लिहले. आणि त्यानंतर ते लगेच एक स्नोमॅनचा पुतळा तयार करण्यासाठी ते अंगणात धावले.





सगळ्यांनी एकत्र काम केले: काही मुलांनी बर्फ बाजूला केला. दुसऱ्यांनी बर्फाचे गोळे केले.

मुलांनी स्नोमॅनच्या डोक्यावर एक जुनी बदली ठेवली. त्यांनी कोळशाने त्याचे डोळे तयार केले. नाकाच्या जागेवर त्यांनी एक गाजर लावले.

स्नोमॅन पोस्टमनच्या रुपात बघायला खरंच छान वाटत होते.







मुलांनी त्यांला त्यांचे पत्र दिले आणि म्हणाले:“स्नोमॅन, स्नोमॅन!तू एक शूर स्नोमॅन आहेस. तू अंधाऱ्या जंगलात जा. तू आमचे पत्र घेऊन जा. जेव्हा फ्रॉस्ट आजोबा आमचे पत्र वाचतील. मग ते एक अद्भुत, सुंदर नवीन वर्षाचे झाड शोधतील. जंगलात, हिरव्या सुयासारखे सजलेले. कृपया नवीन वर्षाचे झाड लवकर आणा आम्हा सर्व मुलांसाठी!”



संध्याकाळ झाली होती. मुले घरी गेली, परंतु हिममानव रस्त्यावर उभा राहिला. तो म्हणाला: “मुलांनी माझ्यावर एक कठीण काम सोपवले आहे! मला सांग, मी आता कुठे जाऊ?"



“मला तुझ्याबरोबर घेऊन जा!" अचानक बॉबिक पिल्लू म्हणाले. "मी तुला मार्ग शोधण्यात मदत करीन."



"ही चांगली गोष्ट आहे. एकत्र प्रवास करताना जास्त मजा येईल!” स्नोमॅन आनंदी होता. “तू माझे आणि पत्राचे रक्षण करशील. तुला एकत्र केलेला मार्गही आठवेल.”




मग स्नोमॅन आणि बॉबिक पिल्लू बराच वेळ चालत राहिले.
शेवटी ते एका विस्तीर्ण, घनदाट जंगलात पोहोचले.



ससा त्यांना भेटायला धावत आला. "फ्रॉस्ट आजोबा कुठे राहतात?" स्नोमॅनने सशाला विचारले. पण त्या प्रश्नाचं उत्तर द्यायला सशाकडे वेळ नव्हता. एक कोल्हा त्याचा पाठलाग करत होता.



मग बॉबिक पिल्लू ओरडले "डुह, दुह!" आणि मग त्याने सशाचा पाठलाग केला!



हिममानव दुःखी झाला. "मला एकट्यालाच पुढे जावं लागे असं वाटतंय



तेव्हाच बर्फाचे वादळ आले. ते गरजू लागले. बर्फाचे फवारे उडू लागले.



वादळामुळे हिममानव थरथरू लागला, मग त्याच्यावर ठेवलेली बादली आणि गाजर बर्फावर पडली.




दुष्ट कोल्हा परत पळत आला, “तो कुठे गेला ज्याने मला ससा पकडण्यापासून रोखले होते?”

कोल्ह्याने बघितले, पण इथे कोणी नव्हते, फक्त एक पत्र बर्फात पडलेले होते, कोल्ह्याने पत्र उचलले आणि तो तिथून पळाला.



बोबिक पिल्लू परत आले. “हिममानव कुठे आहे?” पण इथे कोणी नव्हते.



त्याचवेळी लांडगा, कोल्हाजवळ आला. “तू काय घेऊन जात आहे, भावा?” लांडगा म्हणाला. “चल एकमेकांत वाटून घेऊ या!”

“मला वाटून घ्यायचे नाही. असे म्हणून कोल्हा तिथून पळून गेला. लांडगा वेगाने कोल्ह्याच्या मागे धावला.


एक जिज्ञासु मैगपाई चिमणी त्यांच्या मागे मागे केली.



बिचारे बोबिक पिल्लू रडू लागले, मग ससा म्हणाला: “तुला चांगला धडा मिळाला. आता माझा पाठलाग करू नको आणि मला घाबरवू नको.”



बोबिक पिल्लू म्हणाले, “मी तुला घाबरवणार नाही, आणि तुझा पाठलागही करणार नाही,” आणि मग तो अजून जोरात रडू लागला.




“रडू नको, आम्ही तुला मदत करू,” ससा म्हणाला.
“आम्ही सशांना मदत करू,” खारूताई म्हणाल्या.



मग सशांनी हिममानव करण्याचा प्रयत्न केला. त्याकामासाठी खारूताईंनी मदत केली. सशांनी आपल्या पंजांनी बर्फ गोळा केला. खारुताईनी आपल्या शेपटीनी एका ठिकाणी बर्फाचा ढीग केला.

खारूताई आणि सशांनी परत हिममानवाच्या डोक्यावर बादली ठेवली, कोळशाचे डोळे केले आणि नाकाच्या जागी परत एक गाजर लावले.

हिममानव म्हणाला, “मला परत घडवले त्याबद्दल आभारी आहे. कृपया आता फ्रॉस्ट आजोबांना शोधण्यासाठी मला मदत करा.”



सगळे प्राणी हिममानवाला अस्वलाकडे घेऊन गेले. अस्वल आपल्या गुहेत झोपला होता. प्राण्यांनी त्याला उठवले. हिममानवाने अस्वलाला सांगितले की मुलांनी आजोबांसाठी एक पत्र त्याच्याबरोबर पाठवले होते.



"पत्र कुठे आहे?" अस्वलाने आळस देत विचारले. सगळे प्राणी पत्र शोधू लागले. पण त्यांना पत्र मिळाले नाही.





"फ्रॉस्ट आजोबा पत्राच्या शिवाय ख्रिसमस झाड देणार नाही." अस्वल म्हणाले. "तुम्ही घरी जाणे योग्य होईल. मी तुम्हाला जंगलाच्या बाहेर घेऊन जाईन."

अचानक मैगपाई उडत आली. ती ओरडली,
"हे घ्या पत्र! हे घ्या पत्र!"
मग मैगपाईने त्यांना सांगितले की त्यांना पत्र कसे मिळाले ते."

आणि ते असे प्रकारे झाले.





मग प्राणी आणि हिममानव
पत्र घेऊन आजोबांकडे गेले.



हिममानव घाईत होता आणि काळजीत होता.
जल्दी में था और चिंतित था.
तो कोणत्या न कोणत्या पहाडावरून घसरून
एखाद्या खड्ड्यात पडू शकला असता. नाहीतर
कशाला तरी टक्कर देवून पडला असता.



बरं, अस्वलाने मदत केली, नाहीतर हिममानव नक्कीच पडला असता.

शेवटी सगळे लोक आजोबांकडे पोहचले. आजोबांनी पत्र वाचले आणि म्हणाले, “तुम्ही एवढ्या उशिरा का आलात? आता हिममानवाकडे मुलांसाठी झाड देण्यासाठी वेळ नाही.”





पण सगळ्यांनी पोस्टमनची तारीफ केली. त्यांनी पोस्टमन बरोबर काय काय झाले ते सांगितले. मग आजोबांनी त्यांना आपली बर्फ गाडी दिली. आणि त्यात नवीन वर्षासाठी झाड घेऊन पोस्टमन वेगाने मुलांकडे शहरात आला.



अस्वल आपल्या घरी आले. ते आता वसंतापर्यंत झोपेल.



दुसऱ्या दिवशी सकाळी, हिममानव शहरात त्याच जागी उभा होता,
त्याच्या हातात पत्रा ऐवजी नवीन वर्षासाठी एक झाड होते..



पूर्व प्राथमिक मुलांसाठी पुस्तकांचे लेखन आणि चित्र
व्लादिमीर ग्रिगोरिएविच सुतीव

नवीन वर्षाचे झाड

International project:
"Mini Progress and Mini Raduga".